२० सार्वजनिक वित्त (Public Finance)

- सार्वजनिक वित्ताला सार्वजनिक आय-व्यय असेही म्हणतात.
- आय म्हणजे शासकीय उत्पन्न होय व व्यय म्हणजे शासकीय खर्च होय.
  अर्थ - "संघराज्य सरकार, स्थानिक सरकार तसेच इतर सरकारी संस्था यांच्या उत्पन्नाची आणि खर्चाची चिकीत्सा करणारी अभ्यासशाखा म्हणजे सार्वजनिक वित्त होय."
- सार्वजनिक वित्त या घटकामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.
- अर्थसंकल्प, लेखा, लेखापरिक्षण, केंद्रीय कररचना इत्यादी.

अर्थसंकल्प / अंदाजपत्रक / Budget -



- अर्थ - विशिष्ट आर्थिक वर्षातील खर्च व उत्पन्नाचे विवरण म्हणजे अर्थसंकल्प होय.
- Budget हा शब्द **फ्रेंच** शब्द Bougettee या शब्दापासून झाला आहे. Bougettee म्हणजे चमड्याची बॅग किंवा पर्स असा अर्थ होतो.
- इंग्लंड मध्ये 1733 मध्ये पहिल्यांदा 'Budget' हा शब्द वापरला गेला.
- इंग्लंडमध्ये ट्रेझरी विभाग Budget तयार करते.
- तसे USA मध्ये Budget सादर करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग आहे (Office of Management & Budget)
- त्याप्रमाणे भारतात अर्थमंत्रालयामार्फत Budget सादर केले जाते.
- केंद्र सरकारमधील अर्थमंत्री संसदेत (लोकसभेत) अर्थसंकल्प सादर करतात.
- अर्थसंकल्पीय धोरणाला राजकोषीय धोरण / सार्वजनिक वित्ताचे धोरण असेही म्हणतात.

अर्थसंल्पाविषयी महत्त्वाचे -

- **राज्यघटनेतील नाव - वार्षिक वित्तीय विवरण पत्रक** (Anual Financial Statement)
- अर्थसंकल्प प्रत्येक वर्षाच्या 1 फेब्रुवारीला मांडला जातो.
- अर्थसंकल्पीय अधिवेशन जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात बालोवले जाते. आर्थिक पाहणी 30 जानेवारीला सादर केली जाते.
- **1 एप्रिल ते 31 मार्च** या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प लागू केला जातो.
- 1 वर्षापेक्षा कमी कालखंडासाठी मांडलेल्या अर्थसंकल्पात अंतरिम अर्थसंकल्प म्हणतात.
- केंद्रीय अर्थसंकल्प **कलम** 112 नुसार सादर केला जातो.
- राज्याचा अर्थसंकल्प **कलम** 202 नुसार सादर केला जातो.
- अर्थसंकल्पात भांडवली विभाग व महसुली विभाग हे दोन महत्त्वाचे घटक आहेत.

- अर्थसंकल्प मांडण्याचा घटनात्मक अधिकार राष्ट्रपती यांचा आहे तर प्रत्यक्ष अर्थसंकल्प मांडण्याचे कार्य अर्थमंत्री करतात.
- अर्थसंकल्प सर्वप्रथम लोकसभेत मांडला जातो.
- 1971-72 पासून अर्थसंकल्प सकाळी 10 ते 11 या वेळेत सादर केला जातो, पूर्वी सायंकाळी अर्थसंकल्प मांडला जात असे.

भारतातील अर्थसंकल्पाची वाटचाल -



- 7 एप्रिल, 1860 मध्ये जेम्स विल्सन यांनी भारतासाठी पहिल्यांदा अर्थसंकल्प लागू केला.

- स्वतंत्र भारताचा पहिला अर्थसंकल्प वित्तमंत्री आर.के. शण्मुख चेट्टी यांनी 26 नोव्हेंबर, 1947 रोजी मांडला.
- 1950-51 मध्ये जॉन मथाई यांनी भारतीय गणराज्यासाठी Budget सादर केले.
- 1951-52 मध्ये सी.डी. देशमुख यांनी अर्थसंकल्प सादर केला आहे.
- 1947-48 मध्ये लियाकत अली खान यांनी स्वातंत्र्यापूर्वी अर्थसंकल्प सादर केले आहे.

अर्थसंकल्पाचे प्रकार

संतुलित अर्थसंकल्प
- एकुण उत्पन्न = एकुण खर्च
- अविकसीत देशांसाठी उपयुक्त.

अधिक्याचा अर्थसंकल्प
- एकूण उत्पन्न > खर्च कमी
- विकसीत देशांसाठी उपयुक्त.

तुटीचा अर्थसंकल्प
- एकूण उत्पन्न < खर्च कमी विकसनशील देशांसाठी उपयुक्त.
- लॉर्ड जे.एम. केन्स यांनी ही संकल्पना मांडली.

कार्यात्मक वित्त

महत्वाचे मुद्दे –

- फंक्शनल फायनान्स हा एक दुसऱ्या महायुध्दात विकसित केलेला एक अर्थशास्त्र सिध्दांत आहे जो अर्थव्यवस्थेमध्ये सरकारी हस्तक्षेपास प्रोत्साहन देतो.
- कार्यात्मक वित्त, बेरोजगारी कमी करण्यासाठी, कर धोरणाद्वारे ग्राहकांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि व्याज, दर महागाई आणि अर्थव्यवस्थेमधील रोखीचा प्रवाह नियंत्रित करण्यासाठी तूट खर्चास प्रोत्साहन देते.
- कार्यात्मक वित्त अब्बा लर्नर या रशियन जन्माने, ब्रिटिश–उरित अर्थशास्त्राने विकसित केले होते.
- लर्नर एक विद्वान, प्राध्यापक, अनुयायी आणि प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केनेस यांचे दुभाषी होते.
- केन्स इष्टतम आर्थिक वातावरण तयार करण्यासाठी सरकारच्या हस्तक्षेपाचे समर्थक होते.

खासगी आयव्यय	सार्वजनिक आयव्यय
१. खासगी आयव्याचे उद्दिष्ट 'व्यक्तीचे महत्तम कल्याण' हे असते.	१. सार्वजनिक आयव्ययाचे उद्दिष्ट संपूर्ण समाजाचे कल्याण हे असते.
२. खासगी आयव्ययाचे उद्दिष्ट व क्षेत्र संकुचित असते.	२. सार्वजनिक आयव्याचे उद्दिष्ट व क्षेत्र व्यापक असते.
३. व्यक्तीच्या उत्पन्नाची साधने मर्यादित असतात.	३. सरकारच्या उत्पन्नाची साधने अनेक असतात.
४. व्यक्तीची उत्पन्न मिळविण्याची शक्ती मर्यादित असते.	४. सरकारची उत्पन्न मिळविण्याची शक्ती अमर्याद असते.

घटनेतील स्थान

कलम ८७ – राष्ट्रपती विशेष अभिभाषण

कलम ११० – धन विषयक विधेयकाची व्याख्या

कलम ११२ – वार्षिक वित्तीय विधेयक (अंदाजपत्रक)

कलम ११४ – विनियोजन विधेयक

कलम ११६ – लेखा, पत यावर मतदान/ अपवादात्मक अनुदान

कलम ११७ – वित्तीय विधेयकाबाबत विशेष तरतुदी

कलम ११९ – वित्तीय व्यवहाराबाबत संसदेतील कार्यपध्दती कायद्याद्वारे नियंत्रण

कलम १४८ – भारताचा नियंत्रक व महालेखापरिक्षक

कलम १४९ – भारताचा नियंत्रक व महालेखापरिक्षक

कलम १५० – संघ व राज्यांच्या लेखांच्या स्वरुप/ लेखा जमा करणे

कलम १९८ – धनविधेयकाबाबत विशेष कार्यपध्दती

कलम २०६ – लेखा, पत यावर मतदान व अपवादात्मक अनुदान

कलम २०७ – वित्तीय विधेयकाबाबत विशेष तरतुद

कलम १०९ – धन विधेयकाबाबत विशेष कार्य पध्दती

कलम १११ – विधेयकाला मंजुरी

कलम ११३ – अंदाजाबाबत संसदेतील कार्यपध्दती

कलम ११५ – पुरक, अतिरिक्त/अनुदान

कलम ११८ – कार्यपध्दतीचे नियम

कलम १५१ – लेखा अहवाल

कलम २०२ – वार्षिक वित्तीय विधेयक

कलम २८० – वित्त आयोग

कलम २६५ – प्रत्यक्ष कर

सार्वजनिक वस्तु व सेवा	खाजगी वस्तु व सेवा	गुणात्मक वस्तु व सेवा
– ज्या वस्तु शासनामार्फत उत्पादित केल्या जातात व ज्यांचा सार्वजनिकरित्या वितरण केले जाते. – या राजस्व व्यवहारातून उपलब्ध होतात. – सार्वजनिक वस्तुच्या उपभोगाबाबत संलग्नता असते. – सार्वजनिक वस्तु व सेवाच्या बाबतीत उपभोगत्याला फारशी माहिती नसते. – होणारा खर्च व मिळणारा लाभ यात वेळेवे अंतर असते. – या वस्तुमध्ये होणाऱ्या लाभाचे स्वरुप स्पष्ट होते. – खर्च करणारा व ती वस्तु मिळवणारा एकच असतो असे नाही. – सार्वजनिक वस्तुच्या उपभोगाचा परिणाम इतरांवर होतो.	– उत्पादन आणि वितरण खाजगी व्यक्तीकडून – बाजार यंत्रणेकडून उपलब्ध – या वस्तुच्या उपभोगासाठी स्पर्धा नसते. – विक्रीतून मिळालेला लाभ आणि होणारा लाभ एकाच वेळी – खर्च करणारा व वस्तु मिळवणारा एकच व्यक्ती.	– सार्वजनिक खाजगी दोन्ही वस्तुचा समावेश होतो. – या वस्तूच्या वापराविषयी जनजागृती केली जाते. उदा. शिक्षण, आरोग्य इत्यादी – सामाजिक कल्याणाच्या हेतुने या वस्तुचे वितरण होते.

अंदाजपत्रकाचे घटक

- **महसुली अर्थसंकल्प**
  - **महसुली जमा**
    - **कर उत्पन्न**
      1) प्रत्यक्ष कर
      2) अप्रत्यक्ष कर
    - **करेत्तर उत्पन्न**
      1) राजकोषीय सेवा
      2) व्याज उत्पन्न
      3) नफा व लाभांश -RBI-LIC- बँक इ.
  - **महसुली खर्च**
    - **महसुली योजना खर्च**
      सामाजिक मालमत्ता देखभालीवरील खर्च
    - **बिगर योजना खर्च**
      1) कर्जावरील व्याज
      2) संरक्षणाचा खर्च
      3) अनुदाने
      4) नागरी प्रशासन खर्च
         उदा. शासकीय पगार खर्च
      5) राज्य व केंद्रशासित प्रदेशांना
         दिलेले अनुदान
- **भांडवली अर्थसंकल्प**
  - **भांडवली जमा**
    - **निव्वळ कर्ज उभारणी**
    - **इतर देणी**
    - **कर्जे वसुली**
    - **इतर भांडवली मिळकत**
  - **भांडवली खर्च**
    - **भांडवली योजना खर्च**
      1) केंद्रीय नियोजनावरील खर्च
      2) राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना
         दिलेली मदत
    - **बिगर योजना खर्च**
      1) संरक्षणाचा भांडवली खर्च
      2) राज्य, केंद्रशासित प्रदेश,
         सार्वजनिक उद्योगांना दिलेले कर्जे
      3) घेतलेल्या कर्जाची परतफेड



अर्थसंकल्पीय तुट

	२०१७–१८ वास्तविक	२०१८–१९ वास्तविक	२०१९–२० बजेट अनुमान	२०१९–२० संशोधिक अनुमान	२०२०–२१ बजेट अनुमान
१. राजकोषिट तुट	३.५	३.४	३.३	३.८	३.५
२. महसुली तुट	२.६	२.४	२.३	२.४	२.७
३. प्रभावी महसुली तुट	१.५	१.४	१.३	१.५	१.८
४. प्राथमिक तुट	०.४	०.४	०.२	०.७	०.४

स्त्रोतः अर्थसंकल्प २०२०–२१

केंद्र व राज्य सरकार यांचे तीन निधी

1) संचित निधी -

- निर्मिती कलम 266 (1) नुसार
- पुढील निधीचा या निधीमध्ये समावेश होतो.
    1) शासनाचे सर्व कर उत्पन्न.
    2) शासकीय कर्जे
    3) शासकीय कर्जाची वसुली
    4) सार्वजनिक उद्योगाचा नफा
- संचित निधीतून रक्कम प्राप्त करण्यासाठी किंवा पैसे काढण्यासाठी लोकसभा आणि विधानसभेची परवानगी लागते.

2) भारताचे व राज्याचे सार्वजनिक निधी/लेखे -

- या लेख्यांना 'लोकलेखे' असेही म्हणतात.
- निर्मिती : कलम 266(2) नुसार लोकलेखे जमा केले जातात.
- यामध्ये शासकीय उत्पन्नाव्यतिरिक्त इतर निधीचा समावेश असतो. उदा. पेन्शन निधी, PF, जनतेच्या अल्प बचती, पोस्टातील बचती इत्यादी.
- या निधीतील पैसा शासनाकडून वापरला जातो. त्यास संमतीची गरज नसते.
- विशिष्ट काळानंतर / करारानंतर तो निधी शासनाला जनतेस परत करावा लागतो. उदा. PF

3) भारताचा व राज्याचा आकस्मिक निधी -

- निर्मिती - कलम 267 नुसार संसद व राज्यविधीमंडळ कायद्यानुसार झाली आहे.
- आकस्मिक खर्चासाठी हा निधी वापरला जातो.
- कायद्यानुसार विशिष्ट रक्कम या निधीत राखीव केली जाते.
- वेळेनुसार खर्च करताना परवानगीची गरज नसते.
- संसदीय अधिवेशनात या निधीची परवानगी घ्यावी लागते व परत या निधीत ती रक्कम जमा करावी लागते.
- हा निधी राष्ट्रपती व राज्यपालाच्या ताब्यात असते.

अर्थविषयक संसदीय समित्या

1) लोक अंदाज समिती

- **स्थापना** - 1950
- **सदस्य** - लोकसभेतून 30
- **अध्यक्ष** - 30 सदस्यांपैकी बहुमत असलेल्या सरकारच्या एका सदस्याची.
- **कार्यकाल** - 1 वर्ष

कार्य -

- सरकारच्या खर्चात काटकसर सुचवणे.
- सरकारच्या जमा-खर्चाच्या आर्थिक व्यवहारांमध्ये सुसूत्रता आणणे.
- अर्थसंकल्पीय जमाखर्चाचा अंदाज काढून त्याचे तपशीलवार परीक्षण करणे.
- संसदेसमोर जमा खर्चाचे अंदाज सादर करण्यासाठी वित्तमंत्रालयाला मदत करणे.

2) लोकलेखा समिती -

- **स्थापना** - 1919 च्या कायद्यातील तरतुदी नुसार 1921 मध्ये करण्यात आली.
- **सदस्य** - 22 (लोकसभा - 15, राज्यसभा - 7)
- **अध्यक्ष** - लोकसभेचे सभापती 22 सदस्यांपैकी
- **ओळख** - सर्वात जुनी समिती
- **कार्यकाल** - 1 वर्ष

कार्य -

- शासनाच्या जमा-खर्चाच्या अहवालाचे विश्लेषण करणे.
- ठरवलेल्या खर्चापेक्षा कमी किंवा जास्त खर्च केला आहे का ते पाहणे.
- अहवालाचे विश्लेषण करुन वित्तीय क्षेत्रातील भ्रष्टाचार उघडकीस आणणे.
- या समितीची 'जुळी बहीण' असे केले जाते.
- समितीचे कार्य केवळ शवविच्छेदनाचे आहे.

3) सार्वजनिक निगम समिती -

- **स्थापना** - 1964
- **सदस्य** - 22 (लोकसभा - 15, राज्यसभा - 7)
- **अध्यक्ष** - 22 सदस्यांपैकी एका सदस्याची
- **कार्यकाल** - 1 वर्ष

कार्य -

- सार्वजनिक उद्योगांचे अहवाल व जमाखर्चाचे परीक्षण करणे.
- भारताच्या सार्वजनिक उद्योगासंदर्भात सादर केलेल्या अहवालांचे परीक्षण करणे.
- सार्वजनिक उद्योगांचे उत्पादन, आर्थिक स्थिती या संदर्भातील अहवालांचे परीक्षण करणे.

तुटीच्या संकल्पना

1) **महसुली तुट** - Revenue Deficit

महसुली उत्पन्न < महसुली खर्च

2) **भांडवली तुट** - Capital Deficit

भांडवली उत्पन्न < भांडवली खर्च

3) **अंदाजपत्रकीय तुट** - Deficit Buget

i) महसुली तुट + भांडवली तुट

ii) एकूण उत्पन्न < एकूण खर्च

4) **वित्तीय तुट** - Financial Deficit

अंदाजपत्रकीय तुट + कर्जे उभारणी

5) **राजकोषीय तुट** - Fiscal Deficit

i) अर्थसंकल्पीय तुट + कर्जे

ii) एकूण प्राप्ती = एकूण खर्च - कर्जे

6) **प्राथमिक तुट** - Primary Deficit

i) राजकोषीय तुट - व्याज

ii) एकूण प्राप्ती + एकूण खर्च + व्याज

7) **चलनविषयक तुट** - Deficit Financing

अर्थसंकल्पीय तुट + RBI ची निर्मिती

8) **परिणामकारक महसुली तुट**-Effective Revenue Deficit

महसुली तुट - अनुदान

अर्थसंकल्पीय तुट

	तुट (Deficit)	2017-18 वास्तविक	2018-19 वास्तविक	2019-20 वास्तविक	2020-21 वास्तविक	2021-22 BE	2021-22 PE	2022-23 BE
1.	राजकोषीय तुट (Fiscal Deficit)	3.5	3.4	4.6	9.2	6.8%	6.9%	6.4%
2.	महसुली तुट (Revenue Deficit)	2.6	2.4	3.3	7.3	5.1 %	4.7%	3.8%
3.	प्रभावी महसुली तुट (Effective Revenue Deficit)	1.5	1.4	2.4	6.2	4.1 %	3.7 %	2.6%
4.	प्राथमिक तुट (Primary Deficit)	0.4	0.4	1.6	5.8	3.1 %	3.3 %	2.8%

Old Budget



New Budget



राजकोषीय धोरण
(Fiscak Policy)

- केंद्रशासनाचे वार्षिक अर्थसंकल्पीय विवरण म्हणजे राजकोषीय धोरण होय.
- राजकोषीय धोरणाचा कालावधी हा वार्षिक असतो.

अर्थ :–

१. व्हँने आणि जॉन्सन :

आर्थिक कृतीची रचना व पातळीवर परिणाम करण्यासाठी सरकारी खर्चात व कररचनेत केलेले बदल म्हणजे वित्तीय/राजकोषीय धोरण होय.

२. जे.ए.मॅकसवेल

राजकोषिय धोरण म्हणजे आर्थिक स्थैर्य मिळविण्यासाठी संतुलित घटक म्हणुन सरकारी खर्च आणि सरकारी उत्पन्न याचा वापर करणे होय.

राजकोषिय धोरणाचे उद्दिष्टे –

उद्दिष्टे

१. आर्थिक स्थैर्य
२. आर्थिक वाढ
३. पूर्ण रोजगार निर्मिती
४. सामाजिक न्याय
५. गुंतवणुक वाढ
६. आर्थिक विषमता कमी करणे.
७. राहणीमान उंचावणे

राजकोषीय धोरणाची साधने

- सार्वजनिक उत्पन्न
- सार्वजनिक खर्च
- सार्वजनिक कर्जे
- कर रचना
- वित्तीय प्रशासन

राजकोषिक धोरणाचे वैशिष्टये

१. सार्वजनिक खर्च, कर्ज, उत्पन्नात बदल
२. राजकोषिय धोरणांचा व मौद्रिक धोरणाचा परस्पर पुरक संबंध
३. व्यापार चक्राचे नियंत्रण
४. केंद्रीय राजकोषिय नियतीची राज्याच्या राज्यकोषिय नितीशी सांगड घालणे.
५. लोकसहभाग

राजकोषीय धोरणाचे प्रकार

प्रसारित/विस्तारित धोरण	संकोचित धोरण
– सार्वजनिक खर्चात वाढ	– सार्वजनिक खर्चात कपात
– कर सवलत दिली जाते	– कर सवलती कमी होतात
– कराच्या दरात कपात	– कराच्या दरात वाढ
– सार्वजनिक कर्जामध्ये वाढ	– सार्वजनिक कर्जात घट
– मंदीच्या काळात प्रभावशाली	– तेजीच्या काळात प्रभावशाली

- व्यापाराच्या वाईट काळात शासनाची भूमिका महत्वाची असते.
- १९२९ च्या जागतिक महामंदीनंतर मौद्रिक धोरणाच्या मर्यादा आणि निर्हस्तक्षेपाच्या धोरणाची निरुपयोगिता स्पष्ट झाली.
- १९२९ च्या मंदीनंतर राजकोषिय धोरणाचे महत्व वाढले. कर आणि खर्चाचा कुशलतेने वापर करुन सरकार अर्थव्यवस्थेला तेजी-मंदीच्या चक्रापासून सुरक्षित ठेवू शकते. लॉर्ड केन्स राजकोषिय नितीचा पुरस्कार - लॉर्ड केन्स यांनी केला आहे.

प्रसारित / व्यापक/विस्तारित राजकोषिय धोरण

सार्वजनिक खर्च ↑	⟶	गुंतवणूक ↑	उत्पादन ↑	रोजगार ↑
सार्वजनिक कराचे दर ↓	⟶	उत्पन्न ↑	बचत ↑	गुंतवणूक↑
सार्वजनिक कराचे प्रमाण ↑	⟶	राजकोषिय तूट ↑	प्राथमिक तूट ↑	

→ मंदीतून बाहेर पडण्यासाठी प्रसारित धोरणाचा उपयोग केला जातो.

संकुचित राजकोषिय धोरण

सार्वजनिक खर्च ↓	⟶	गुंतवणूक ↓	उत्पादन ↓	बेरोजगारी ↑
सार्वजनिक कर्जाचे प्रमाण ↓	⟶	राजकोषिय तूट ↓	प्राथमिक तूट ↓	
कराचे दर ↑	⟶	उत्पन्न ↓	बचत ↓	

→ तेजीच्या काळात उपयुक्त धोरण

अनुदानाच्या मागण्याबाबत कपात प्रस्ताव (Cut Motion)

काटकसर कपात
- या कपातीमध्ये सार्वजनिक योजनांवर कमी खर्च केला जातो.
- विशिष्ट रक्कम कमी करण्यासंदर्भात ही कपात प्रस्ताव सादर केली जाते.

धोरणात्मक कपात
- 1 रुपयापर्यंत कपात प्रस्ताव सुचविले जाते. येथे धोरण अमान्य असते.
- धोरण रद्द करावे अशी मागणी असते.

प्रतिणात्मक कपात
- 100 रुपयापर्यंत अनुदानाची मागणी करण्यासंदर्भात असते.
- यामध्ये टोकण Amount कमी करणे अपेक्षित असते.

पूर्वी 109 अनुदान मागण्या होत्या सध्या 98 अनुदान मागण्या आहेत.

आर्थिक पाहणी अहवाल–२०१९–२०

GDP (स्थूल देशांतर्गत उत्पादन) – चालू किंमतीला मापन– लाख कोटीमध्ये

वर्षे	२०१६–१७	२०१७–१८	२०१८–१९	२०१९–२०
GDP	153.6	171.0	190.1[a]	204.4[b]

GDP (स्थूल देशांतर्गत उत्पादन) – स्थिर किंमतीला मापन– लाख कोटीमध्ये

वर्षे	२०१६–१७	२०१७–१८	२०१८–१९	२०१९–२०
GDP	123.0	131.8	140.8	147.8

वृध्दीदर प्रमाणमध्ये (%) Growth Rate

वर्षे	२०१६–१७	२०१७–१८	२०१८–१९	२०१९–२०
GDP वृध्दी दरानुसार	8.2	7.2	6.8.[a]	5.0[b]

स्थुल मूल्यावर्धित GVA-Gross Value Added

वर्षे	२०१६–१७	२०१७–१८	२०१८–१९	२०१९–२०
चालू किंमत	139.4	154.8	172.0[a]	185.0[b]
स्थिर किंमत	113.2	121.0	129.1[a]	134.4[b]
GVA वृध्दी दर	7.9	6.9	6.6[a]	4.9[b]

एकूण बचत दर वर्षनिहाय

वर्षे	२०१६–१७	२०१७–१८	२०१८–१९	२०१९–२०
GDP	30.3	30.5	NA	NA

एकूण भांडवल निर्मिती

वर्षे	२०१६–१७	२०१७–१८	२०१८–१९	२०१९–२०
GDP%	30.9	32.3	NA	NA

प्रतिव्यक्ती दरडोई उत्पन्न (PCI) भारतीय रुपयांमध्ये

वर्षे	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०
PCI	1,04,659	1,14,958	1,26,406[a]	1,35,050[a]

किंमत वाढ निर्देशांक

वर्षे	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०
WPI प्रमाण	1.7	3.0	4.3	1.5
CPI प्रमाण	4.5	3.6	3.4	4.1

अन्नधान्य उत्पादन (मिलियन टन)

वर्षे	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०
उत्पादन	275.1	285.0	285.0[a]	140.6[a] खरीप #

आंतरराष्ट्रीय क्षेत्र

वर्षे	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०
निर्यात वध्दती $	5.2	10.0	8.8	-2.0[c]
चालू खाते प्रमाण	-0.6	-1.8	-2.1	+1.5[f]

औद्योगिक उत्पादन निर्देशांक (IIP)

वर्षे	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०
%	4.6	4.4	3.8	0.6[d]

परकीय चलन साठी व विनिमय दर

वर्षे	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०
चलन-साठा	370.0	424.5	412.9	457.5[J]
विनिमय दर	67.1	64.5	69.9	70.4[e]

(डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया)

विद्युत निर्मिती

वर्षे	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०
%	4.7	4.0	3.5	0.3[d]

क्षेत्र निहाय वृध्दी दर :

वर्षे	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	(२०१८-१९ ते २०१९-२०)
कृषी व संलग्न क्षेत्र	5.0	2.9	2.8	-0.1
उद्योग क्षेत्र	5.9	6.9	2.5	-4.4
सेवाक्षेत्र	8.1	7.5	6.9	-0.7
GDP बाजार किंमत	7.2	6.8	5.6	-1.8
GVA बाजार किंमत	6.9	6.6	4.9	-1.7